**CNR No :- MHSI100002992021**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३६/२०२१ :–

## –: निशाणी ४२ वरील आदेश :–

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला 'पुरावा नाही' चा आदेश रद्दबातल होऊन मिळावा यासाठी केलेला आहे.

०२. वादीच्या म्हणण्यानुसार, सदर दाव्याच्या कामी वादी यांच्या विरुद्ध दि.०९.०५.२०२५ रोजी पुरावा नाही चा आदेश करण्यात आलेला होता. पुरावा न देण्यामागे वादी यांचा कोणताही गैरहेतु अगर निष्काळजीपणा नव्हता व नाही. वादी हे आजारी असल्याने तसेच वादी यांची वेळीच वकीलांशी गाठभेट न झाल्याने तसेच मुदतीबाबत कल्पना नसल्याने वेळीच हजर राहून पुरावा देणे अडचणीचे झालेले होते. सदरचा आदेश रद्दबातल न झाल्यास वादी यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही भरुन न येणारे अपरीमित स्वतरुपाचे नुकसान होणारे आहे. सबब, दि.०९.०५.२०२५ रोजी वादी विरुद्ध पारीत झालेला पुरावा नाही चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादीने अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादीचा प्रस्तुतचा अर्ज धादांत खोटा व खोडसाळ असुन वादीस पुरावा दयावयाचा असल्यास त्याने सरतपास देणे आवश्यक

होते व तसे न केल्याने वादीस सदर दाव्यात स्वारस्य नाही हे स्पष्टपणे दिसुन येते त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची तसेच मंजूर करावयाचा झाल्यास जबर खर्चाची रक्कम आकारुन प्रतिवादी क्र. १ यास देण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादी यांना पुरावा सादर करण्याची पुरेशी संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी पुरावा सादर न केल्यामुळे त्यांच्या विरुद्ध दि.०९.०५.२०२५ रोजी 'पुरावा नाही'चा आदेश पारीत करणेत आला. वादीने अर्जात नमुद आजारपणाच्या कारणास्तव कोणताही पुरावा सोबत जोडलेला नाही. त्यामुळे अर्जातील नमुद कारण हे संयुक्तीक व समाधानकारक नाही. वादींच्या या कृत्यामुळे प्रतिवादी व परीणामी न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया गेला आहे. परंतु, अर्ज नामंजूर केल्यास वादींना अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालवावी लागतील. तसेच सदरची बाब नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारी नाही. वादींनी त्यांच्यातर्फे सादर केलेल्या पुराव्याद्वारे दावा गुणदोषावर निकाली करण्यास न्यायालयास मदतच होणारी आहे. वादी यांनी केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन होणारे आहे. त्यामुळे खर्चाचे आदेश पारीत करुन वादींचा अर्ज मंजूर करणे उचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे पारीत करणेत येत आहे :-

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. रक्कम रु. ३००/–(रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.४२ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाची रक्कम रु.३००/–(रुपये तीनशे मात्र) प्रतिवादी क्र. १ यांस आदा केल्यावर, वादी विरुद्ध दि.०९.०५.२०२५ रोजी नि.क्र.०१ वर पारीत झालेला 'पुरावा नाही' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.07.02 10:47:49 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०१/०७/२०२५. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.